RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ७, अंक ९४(३)] सोमवार, ऑक्टोबर ११, २०२१/आश्विन १९, शके १९४३ [पृष्ठे ७, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १७५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ ऑक्टोबर २०२१.

**अधिसूचना**

**ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९.**

क्रमांक ग्रासंअ. २०२०/प्र.क्र.४७/ग्रासं-४.—ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ (२०१९ चा ३५) याच्या कलम १०२ चे पोट-कलम (१) व पोट-कलम (२) च्या खंड (ज) व (ड) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि ग्राहक संरक्षण (राज्य आयोगाचे व जिल्हा मंचाचे अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती, वेतन, भत्ते व सेवाशर्ती) नियम, २०१९ चे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम करीत आहे :—

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ :— या नियमांस महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (राज्य आयोग व जिल्हा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचे वेतन, भत्ते व सेवाशर्ती) नियम, २०२१ असे म्हणावे.

२. व्याख्या :—

(१) या नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,

(क) " अधिनियम " याचा अर्थ ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ (२०१९ चा ३५) असा आहे.

(ख) " सदस्य " याचा अर्थ, जिल्हा आयोगाचा किंवा यथास्थिती राज्य आयोगाचा सदस्य असा आहे.

(ग) " अध्यक्ष " याचा अर्थ, जिल्हा आयोगाचा किंवा यथास्थिती राज्य आयोगाचा अध्यक्ष असा आहे.

(२) या नियमांत वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व संज्ञा यांना अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील.

३. जिल्हा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते :—

(१) अध्यक्ष, वेतनाच्या अधिकालिक वेतनश्रेणीमधील एखाद्या जिल्हा न्यायाधीशास अनुज्ञेय असलेले वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असेल.

(२) सदस्याला शासनाच्या उप सचिवाच्या वेतनाच्या किमान वेतनश्रेणी एवढे वेतन आणि अशा अधिकाऱ्यास अनुज्ञेय असल्याप्रमाणे इतर भत्ते मिळतील.

(३) जिला कोणतेही निवृत्तीवेतन मिळत आहे, अशा अध्यक्ष अथवा सदस्य म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीच्या वेतनामधून तिला मिळणाऱ्या एकूण निवृत्ती वेतनाची रक्कम कपात करण्यात येईल.

(४) अध्यक्ष व सदस्य यांच्या वेतनात ३% दराने दरवर्षी चढत्या रीतीने सुधारणा करण्यात येईल.

४. राज्य आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांना प्रदेय असलेले वेतन व भत्ते :—

(१) राज्य आयोगाच्या अध्यक्षाला राज्याच्या उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधीशास जे अनुज्ञेय आहे, असे वेतन व इतर भत्ते मिळतील.

(२) राज्य आयोगाच्या सदस्याला, शासनाच्या अपर आयुक्ताच्या वेतनाच्या किमान वेतनश्रेणी एवढे वेतन आणि अशा अधिकाऱ्यास अनुज्ञेय असल्याप्रमाणे इतर भत्ते मिळतील.

(३) जिला कोणतेही निवृत्तीवेतन मिळत आहे, अशा अध्यक्ष अथवा सदस्य म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीच्या वेतनामधून तिला मिळणाऱ्या एकूण निवृत्तीवेतनाची रक्कम कपात करण्यात येईल.

(४) अध्यक्ष व सदस्य यांच्या वेतनात दरवर्षी ३% दराने चढत्या रीतीने सुधारणा करण्यात येईल.

५. वैद्यकीयदृष्ट्या पात्र :— शासनाने याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकाऱ्याकडून वैद्यकीयदृष्ट्या पात्र असल्याचे घोषित केल्याशिवाय, कोणत्याही व्यक्तीची अध्यक्ष अथवा सदस्य म्हणून नियुक्ती केली जाणार नाही.

६. नैमित्तिक रिक्त पद :— राज्य आयोगाच्या किंवा यथास्थिती जिल्हा आयोगाच्या अध्यक्षाच्या नैमित्तिक रिक्त पदाच्या बाबतीत अध्यक्ष म्हणून स्थानापन्न होण्यासाठी वरिष्ठतम सदस्याची नियुक्ती करण्याचा अधिकार शासनास असेल.

७. घरभाडे भत्ता :— राज्य आयोगाचा व जिल्हा आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य, राज्य शासनाच्या तत्सम दर्जाच्या गट "अ" अधिकाऱ्याला अनुज्ञेय असलेल्या दराइतक्या दराने घरभाडे भत्ता मिळण्यास हक्कदार असेल.

८. वाहतूक भत्ता :— राज्य आयोगाचा व जिल्हा आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य, राज्य शासनाच्या तत्सम दर्जाच्या गट "अ" अधिकाऱ्याला अनुज्ञेय असलेल्या दराइतक्या दराने वाहतूक, घरभाडे भत्ता मिळण्यास हक्कदार असेल.

९. रजा व वैद्यकीय उपचार आणि रुग्णालय सुविधा :— राज्य आयोगाचे व जिल्हा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, शासनाच्या तत्सम दर्जाच्या गट " अ " अधिकाऱ्याला लागू असलेल्या तरतुदींप्रमाणे रजा, रजा प्रवास सवलत, वैद्यकीय उपचार व रुग्णालय सुविधा मिळण्यास हक्कदार असतील.

१०. वित्तीय व इतर हितसंबंध यांचे घोषणापत्र :— राज्य आयोगाचे व जिल्हा आयोगाचे अध्यक्ष किंवा सदस्य, त्यांच्या पदावर रुजू होण्यापूर्वी, त्यांची मत्ता व दायित्वे आणि वित्तीय व इतर हितसंबंध घोषित करतील.

११. सेवेच्या इतर शर्ती :—

(१) या नियमांमध्ये ज्यांच्या बाबतीत स्पष्ट तरतूद करण्यात आलेली नाही, त्याबाबतीत अध्यक्ष व सदस्य यांच्या सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासनाच्या तत्सम दर्जाच्या गट " अ " अधिकाऱ्याला अनुज्ञेय असल्याप्रमाणे असतील.

(२) अध्यक्ष व सदस्य, राज्य आयोगाच्या किंवा यथास्थिती, जिल्हा आयोगाच्या सेवेतून सेवानिवृत्त झाल्यानंतर, राष्ट्रीय आयोगासमोर, राज्य आयोगासमोर किंवा जिल्हा आयोगासमोर व्यवसाय करणार नाही.

(३) राज्य आयोगातील किंवा यथास्थिती, जिल्हा आयोगातील अध्यक्ष व सदस्य, या नात्याने काम करीत असतांना कोणतेही लवाद विषयक काम हाती घेणार नाही.

(४) राज्य आयोगाचे किंवा यथास्थिती, जिल्हा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य हे ज्या दिनांकास त्याने पद धारण करणे थांबवले असेल त्या दिनांकापासून दोन वर्षे इतक्या कालावधीसाठी राज्य आयोगापुढील किंवा जिल्हा आयोगापुढील जी कार्यवाहीतील पक्षकार असेल अशा व्यक्तीच्या व्यवस्थापनात किंवा प्रशासनात अथवा त्याच्या संबंधातील कोणतीही नोकरी स्वीकारणार नाही :

परंतु, या नियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्या अखत्यारीतील किंवा कोणत्याही सांविधिक प्राधिकरणातील किंवा कोणत्याही केंद्र, राज्य किंवा प्रांतिक अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये स्थापन केलेल्या कोणत्याही महामंडळातील किंवा कंपनी अधिनियम, २०१३ (२०१३ चा १८) याच्या कलम २ च्या खंड (४५) मध्ये व्याख्या केलेल्या शासकीय कंपनीतील कोणत्याही नोकरीस लागू असणार नाही.

१२. पद व गोपनीयतेची शपथ :— अध्यक्ष व सदस्य म्हणून नियुक्ती केली जाणारी प्रत्येक व्यक्ती, तिचे पद ग्रहण करण्यापूर्वी या नियमांना जोडलेल्या नमुना एकमध्ये तिच्या पदाची आणि नमुना दोनमध्ये गोपनीयतेची शपथ घेईल व स्वाक्षरी करील.

१३. वेतन, पारिश्रमिक व इतर भत्ते शासनाच्या एकत्रित निधीमधून भागविण्यात येतील.

१४. जिल्हा आयोगाचे व राज्य आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या सेवेच्या अटी व शर्ती, त्यांच्या पदावधीच्या कालावधीत त्यांचे अहित होईल, अशा रीतीने बदलण्यात येणार नाहीत.

(नियम १२ पहा)

**नमुना एक**

राज्य आयोगाचे व जिल्हा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य पदाच्या शपथेचा नमुना

मी ......................................................., राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र/जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र येथे अध्यक्ष/सदस्य म्हणून नियुक्त झालो असून गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो की/ईश्वर साक्ष शपथ घेतो की, मी, निर्भयपणे व निःपक्षपातीपणे तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता राज्य आयोगाचा/जिल्हा आयोगाचा अध्यक्ष/सदस्य म्हणून माझी कामे निष्ठापूर्वक व सद्सदविवेकबुद्धीने पार पाडीन आणि मी संविधान व देशाचे कायदे यांचे पालन करीन.

(-------------------------------)

**नमुना दोन**

राज्य आयोगाचे व जिल्हा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या गोपनीयतेच्या शपथेचा नमुना

मी,........................................., राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र/जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र येथे अध्यक्ष/सदस्य म्हणून नियुक्त झालो असून गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो/ईश्वर साक्ष शपथ घेतो की, मला ज्ञात होईल अशी कोणतीही बाब, राज्य आयोगाचा/जिल्हा आयोगाचा अध्यक्ष/सदस्य म्हणून माझ्या विचारार्थ आणली जाईल किंवा मला माझी कामे यथायोग्य पार पाडण्यासाठी आवश्यक असेल ते खेरीजकरुन एरवी मी कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे कळवणार नाही किंवा त्यांच्याकडे उघड करणार नाही.

(-------------------------------)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विजय वाघमारे,**

शासनाचे सचिव.

## FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st October 2021.

*NOTIFICATION*

CONSUMER PROTECTION ACT, 2019.

No. Grasana-2020/C.R.47/CP-4.—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clauses (h) and (m) of sub-section (*2*) of section 102 of the Consumer Protection Act, 2019 (35 of 2019) and in supersession of the Consumer Protection (Appointment, Salary, Allowances and Conditions of Service of President and Members of the State Commission and District Forum) Rules, 2019, the Government of Maharashtra hereby makes the following Rules, namely :—

1. Short title and Commencement.—These rules may be called the Maharashtra Consumer Protection (Salary, Allowances and Conditions of Service of President and Members of the State Commission and District Commission) Rules, 2021.

2. Definitions :—

(*1*) In these rules, unless the context otherwise requires,

(a) "Act" means the Consumer Protection Act, 2019 (35 of 2019);

(b) "Member" means a Member of the District Commission or the State Commission, as the case may be ;

(c) "President" means the President of the District Commission or the State Commission, as the case may be;

(d) "Government" means Government of Maharashtra.

(*2*) Words and expressions used herein and not defined and defined in the Act shall have the same meaning respectively assigned to them in the Act.

3. Salaries and allowances payable to President and members of District Commission :—

(*1*) The President shall be entitled to salary and allowances as are admissible to a District Judge in the super time scale of pay.

(*2*) A Member shall receive a pay equal to the pay at the minimum of the scale of pay of a Deputy Secretary of the Government and other allowances as admissible to such officer.

(*3*) The pay of a person appointed as President or member, who is in receipt of any pension, shall be reduced by the gross amount of pension drawn by him.

(*4*) There shall be an annual upward revision of the pay of the President and Member at the rate of 3%.

4. Salaries and allowances payable to President and Members of the State Commission:—

(*1*) President of the State Commission shall receive the salary and other allowances as are admissible to a sitting judge of the High Court of the State.

(*2*) A Member of the State Commission shall receive a pay equivalent to the pay at minimum of the scale of pay of an Additional Commissioner of the Government and other allowances as admissible to such officer.

(*3*) The pay of a person appointed as President or member, who is in receipt of any pension, shall be reduced by the gross amount of pension drawn by him.

(*4*) There shall be an annual upward revision of the pay of the President and Member at the rate of 3%.

5. Medical fitness.— No person shall be appointed as President or member unless he is declared medically fit by an authority specified by the Government in this behalf.

6. Casual vacancy.— In case of a casual vacancy in the office of President in the State Commission or District Commission, as the case may be, the Government shall have the power to appoint the senior most member to officiate as President.

7. House rent allowance.— The President or Member of the State Commission and the District Commission shall be entitled to House rent allowance at the same rate as are admissible to Group'A' Officer of the State Government of a corresponding status.

8. Transport allowance.-The President or Member of the State Commission and the District Commission shall be entitled to transport allowance at the same rate as are admissible to Group ‘A’ Officer of Government of a corresponding status.

9. Leave and medical treatment and hospital facilities.—The President and Members of the State Commission and the District Commission shall be entitled to leave, Leave Travel Concession, medical treatment and hospital facilities as per the provisions applicable to Group ‘A’ officer of Government of a corresponding status.

10. Declaration of Financial and other Interests.—The President or and the Members of the State Commission and the District Commission shall, before entering upon his office, declare his assets, and his liabilities and financial and other interests.

11. Other conditions of service:—

(*1*) The terms and conditions of service of the President and Member with respect to which no express provision has been made in these rules, shall be such as are admissible to a Group 'A' Officer of the Government of a corresponding status.

(*2*) The President and the Members shall not practice before the National Commission, the State Commission or the District Commission after retirement from the service of the State Commission or the District Commission, as the case may be.

(*3*) The President and Members shall not undertake any arbitration work while functioning in these capacities in the State Commission or the District Commission, as the case may be.

(*4*) The President and the Members of the State Commission or the District Commission, as the case may be, shall not, for a period of two years from the date on which they cease to hold office, accept any employment in, or connected with the management or administration of, any person who has been a party to a proceeding before the State Commission or the District Commission:

Provided that, nothing contained in this rule shall apply to any employment under the Central Government or a State Government or a local authority or in any statutory authority or any corporation established by or under any Central, State or Provincial Act or a Government company as defined in clause (45) of section 2 of the Companies Act, 2013 (18 of 2013).

12. Oaths of office and secrecy.—

Every person appointed to be the President and the members shall, before entering upon his office, make and subscribe an oath of office in Form I and oath of secrecy in Form Il annexed to these rules.

13. The salary, remuneration and other allowances shall be defrayed out of the Consolidated Fund of the Government.

14. The terms and conditions of the service of the President and the members of the District Commission and the State Commission shall not be varied to their disadvantage during their tenure of office.

[see rule 12]

FORM I

Form of Oath of Office for the President and Member of the State Commission and

District Commission

I, ………………………………………….. , having been appointed as the President Member in the State Consumer Disputes Redressal Commission, Maharashtral District Consumer Disputes Redressal Commission, Maharashtra do solemnly affirm/do swear in the name of God that I will faithfully and conscientiously discharge my duties as the President/Member of the State Commission/District Commission to the best of my ability, knowledge and judgment, without fear or favor, affection or ill-will and that I will uphold the Constitution and the laws of land.

(-------------------------------)

FORM II

Form of Oath of Secrecy for the President and Member of the State Commission and District Commission

I, ………………………………………….. , having been appointed as the President/Member of the State Consumer Disputes Redressal Commission, Maharashtra / District Consumer Disputes Redressal Commission, Maharashtra do solemnly affirm/do swear in the name of God that I will not directly or indirectly communicate or reveal to any person or persons any matter which shall be brought under my consideration or shall become known to me as President/Member of the State Commission/District Commission except as may be required for the due discharge of my duties as the President/Member.

(-------------------------------)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIJAY WAGHMARE,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.